# ।। अथ ओगण ग्राहीच्या अंग ।।

## मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ ओगण ग्राहीच्या अंगाचे भाषांतर प्रारंभ ।।

।। कवत ।।

चलणी के मुख फूस ।। फूस कोळु मुख जाणो ।।
चिंचड त्यागे दुध ।। जाय कछ माह समाणो ।।
गलणी कस कूं छाड ।। जाण कूचो मुख राखे ।।
परणी को संग छाड़ ।। गुंज वैस्या संग भाखे ।।
निरमल जल कूं जो तजे ।। जेन नीर मेलो लेहे ।।
सुखराम दास अग्यान नर ।। गुण छोड ओगण गहे ।।१।।

संसारात कित्येक मनुष्य,दुसऱ्यांचा त्याच्यात आतील अवगुण पाहून घेऊन घेतात परंतु त्यांच्यात त्याचा चांगल्या गुणांना घेत नाही,संतांचे गुण तर घेत नाहीत परंतु संतामध्ये काही अवगुण राहीला तर त्याला पकडून ठेवतात,चांगल्या गुणाला फेकून देतात,जसे चाळणी कचरा तर आपल्या आत ठेवून घेते व चांगल्या सार वस्तुचा त्याग करुन देते,अशाप्रकारे उसाच्या घाणा रसाचा,ऊसाचे सालपटास धरुन ठेवतो आणि रसाला त्यागून देतो,जसे चिंचड म्हणजे गोचीड गाईच्या स्तनाला लागून राहते,परंतु गाईचे दुध नाही,गाईचे रक्त पिते,जसे कापडाची चाळणीही वस्तुचा साररुपी रस सोडून, वस्तुचा असार रुपी कचरा पकडून ठेवते.कोणी आपली पाणीग्रहण(विवाह)केलेली पत्नी त्यागून, वेश्येसी गोपनीय गोष्टी करतात.अशाप्रकारे जैनधर्मी साधु,निर्मळ जळाचा(पाण्याचा)त्याग करुन फेकून देतात.जसे खराब पाणी ते घेतात,अशाप्रकारे जे अज्ञानी पुरुष आहे,ते साधु संताचा अवगुणांना घेऊन घेतात,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१।।

।। इति ओगण ग्राही को अंग संपूरण ।।